# मानवेंद्रनाथ रॉय यांचे राजकीय विचारप्रणालीतील योगदान

– प्रा. राजेंद्र शामराव पुजारी

**मानवेंद्रनाथ रॉय यांचे मार्क्सवादी विचार :**

भारतातील स्वातंत्र्यप्राप्तीच्या आंदोलनात आंतरराष्ट्रीय स्तरावरून मदत मिळावी, या अपेक्षेने रॉय यांनी जपान, अमेरिका, जर्मनी, चीन यांच्या संपर्कात राहाण्याचे ठरविले. यांपैकी काही राष्ट्रांना तर त्यांनी प्रत्यक्ष भेटीही दिल्या होत्या. रासबिहारी बोस, डॉ. सन-यत-सेन यांनाही ते भेटले. याच काळात चीनमधील जर्मनीचें राजदूत हिंझ यांनाही ते भेटले. या साऱ्या प्रवासमंथनातून भारतातील क्रांतिलढ्यासाठी एम.एन. रॉय यांना आश्वासने तर भरपूर मिळाली, पण मदत मात्र तशी अत्यल्पच मिळाली. भारतातील क्रांतिकार्याला मदत मिळविण्यासाठी अशाच एका अमेरिकावारीत त्यांनी आपल्या मित्राच्या सल्ल्याने नरेंद्रनाथ हे नाव बदलून 'मानवेंद्रनाथ' हे नाव धारण केले. अमेरिकेकडून क्रांतिकार्यासाठी भरीव मदत मिळेल, ही त्यांची अपेक्षा फोल ठरली. यातूनच त्यांना नैराश्याने ग्रासले, पण हे नैराश्य परिवर्तनाची नांदीच ठरले. याच सुमारास समाजवादी विचार जगावर आपली छाप पाडत होते. एम.एन.रॉय यांनाही या विचारांचा संसर्ग झाला. कार्ल मार्क्सच्या साहित्याची झालेली ओळख पुढे अधिकाधिक दृढ होत गेली आणि यातूनच केवळ भारतीय राष्ट्रीय आंदोलन या मर्यादित भूमिकेत रममाण होण्यापेक्षा जगातील सर्व शोषितांचा लढा अशी विश्वात्मक भूमिका त्यांना अधिक महत्त्वाची वाटायला लागली. जगातील शोषितांची लढाई आता रॉय यांना प्राथम्यक्रमाची अधिक महत्त्वाची वाटायला लागली. यातूनच उग्रराष्ट्रवादाचे समर्थक असलेले एम. एन. रॉय १९१५ ते १९४६ या काळात मार्क्सवादी बनले.

(१) मार्क्सवादाला संकुचित विचारसरणी बनवायची नसेल, तर बदलत्या परिस्थितीनुसार त्यात योग्य सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. कोणत्याही तत्त्वाबद्दल दुराग्रह न बाळगणे हाच खरा शास्त्रीय दृष्टिकोन असतो.

(२) भांडवलशाही अर्थव्यवस्थेत श्रमजीवी वर्गाचे भांडवलदारवर्गाकडून

होणारे शोषण नाहीसे करून शोषणमुक्त समाज निर्माण करणे हे मार्क्सचे उद्दिष्ट रॉय यांना महत्त्वाचे वाटत होते. रॉय यांच्या मते व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि सामाजिक समता ही सर्वोच्च मूल्ये होती. मार्क्सवादानुसार इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात समाजात 'आहे रे आणि नाही रे' वर्ग निर्माण होतात. भांडवलदार व मजूर वर्ग उदयास येतात. रॉय यांच्या मते वर्गयुद्ध अटळ मानल्यास आणि व्यक्तीच्या सर्जनशीलतेकडे दुर्लक्ष केल्यास त्यातून सर्वंकष शासनाचा उदय होणे अपरिहार्य असते. हे रशियातील साम्यवादी क्रांतीनंतर स्पष्ट झाले आहे.

(३) रॉय यांच्या मते मार्क्सच्या ऐतिहासिक मीमांसेमध्ये आर्थिक घटकांचाच विचार करण्यात आलेला आहे व तो एकांगी आहे. मार्क्सची ही संकल्पना मान्य केली, तर ऐतिहासिक विकासातील माणसाचे कर्तृत्व नाकारल्यासारखे होईल. कारण माणूस हा सृजनशील आहे आणि आपल्या सृजनशीलतेने तो समाजात योग्य ते बदल घडवून आणू शकतो. रॉय यांच्या मते मार्क्सवादात नैतिक नियमांना स्थान नाही. समाजवाद ही भांडवलशाहीनंतरची अवस्था आहे आणि ऐतिहासिक विकासानुसार ती अवस्था येथे अपरिहार्य आहे. रॉय यांच्या मतानुसार मानवी समाजाच्या उत्क्रांतीत नैतिक शक्तीच्या प्रभावाची दखल मार्क्सने घेतलेली नाही. बदलत्या परिस्थितीनुसार मार्क्सवादामधील सिध्दान्ताचा अन्वयार्थ लावला पाहिजे आणि त्यात सुधारणा केली पाहिजे, असा रॉय यांचा विचार होता.

**मानवेंद्रनाथ रॉय यांचा नवमानवतावाद –**

मार्क्सवादाचा एकेकाळी हिरिरिने प्रचार करणाऱ्यांपैकी अनेकांची त्याच्या प्रत्यक्ष प्रयोगानंतर निराशा झाली. रशियात राज्यक्रांतीनंतर विकसनशील समाज–रचना अस्तित्वात येईल अशी त्यांची अपेक्षा होती. क्रांतीनंतर त्यात विकृती निर्माण झाल्याचे त्यांच्या अनुभवाला आले. त्यामुळे एका क्रांतीवरील आणि मार्क्सवादावरील त्यांच्या श्रद्धेला प्रचंड धक्का बसला. त्यातूनच मार्क्सवादाकडे त्याचा प्रयोग जमेस धरून चिकित्सक दृष्टीने पाहाण्याची आवश्यकता त्यांना वाटू लागली. या चिकित्सक विचारवंतांत प्रसिद्ध तत्त्वचिंतक मानवेंद्रनाथ रॉय यांचे स्थान विशेष महत्त्वाचे आहे.

**नवमानवतावादाची मूलतत्त्वे –**

'नवमानवतावाद' या आपल्या ग्रंथात रॉय यांनी तत्त्वप्रणालीची काही ठळक तत्वे सांगितली आहेत. ती पुढीलप्रमाणे आहेत.

**(१) सर्व मानवजातीचे मूळ माणूसच आहे –**

जीवन हे स्वयंपूर्ण असून, कोणतीही दैवी शक्ती ते घडवत नाहीत. काहींचे जीवन व्यक्ती स्वतःच घडवत असते. मानवी जीवन समजून घेताना कोणत्याही अति भौतिकशक्तीची कल्पना न करता केवळ माणूस आणि त्याची मूलभूत

प्रेरणा समजून घेतली पाहिजे. सारे विश्व हे ईश्वराचे आहे. माणसाचे भवितव्य त्याच्या नशिबावर किंवा नियतीवर अवलंबून आहे असे मानणाऱ्या लोकांना मानवतावादी म्हणता येणार नाही. आपले भवितव्य घडविण्याची क्षमता आहे, असे मानणारा मानवतावादी असू शकतो.

MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE-17

**(२) व्यक्तीचे जीवन समृद्ध असणे –**

मानवी जीवन अधिकाधिक चांगले समृद्ध कसे करता येईल, याबाबत स्वमानवतावाद आस्था बाळगतो. व्यक्तीचे जीवन समृद्ध करणाऱ्या घटकांचा विचार केला जातो. देव, नियती, आत्मा इत्यादी शास्त्रीयदृष्ट्या त्यांचे अस्तित्व सिद्ध करता येत नाही अशा अधिकाधिक गोष्टींबाबत नवमानवतावाद आस्था बाळगत नाही.

**(३) माणसाच्या मूलभूत प्रेरणा –**

स्वातंत्र्याची इच्छा व सत्याचा शोध ह्या माणसांच्या दोन प्रमुख मूलभूत प्रेरणा आहेत. माणसामधील स्वातंत्र्याची प्रेरणा चिरंतन आहे. स्वातंत्र्य म्हणजे माणसाची समृद्ध जीवन जगण्यासाठी अखंडपणे चाललेली धडपड होय. निसर्गाचे ज्ञान ज्याप्रमाणे वाढत जाते त्या प्रमाणात मनुष्य नैसर्गिक अडचणीतून अधिकाधिक मुक्त होत जातो. रॉय यांनी प्रतिपादन केलेल्या तात्त्विक विचारांची बैठक सर्वस्वी व्यक्तिस्वातंत्र्यवादी आहे. रॉय यांच्या मते, प्रातिनिधिक लोकशाही आणि कामगार हुकुमशाही या दोन्ही राज्यव्यवस्था वरील ध्येयाशी सुसंगत नाहीत. पर्यायी म्हणून त्यानी संघटित लोकशाहीचा पुरस्कार केला आहे. रॉय यांच्या मते राज्यसंस्था म्हणजे समाजाची राजकीय संघटना होय. सामाजिक मालकीचे उद्योगधंदे आणि त्यावर अधिष्ठित अशी आर्थिक नियोजने अमलात यावयाची, तर त्यासाठी राजकीय संघटनेची गरज आवश्यक असते. त्यावर लोकसत्तेचे नियंत्रण असणे गरजेचे आहे. या संघटनेचे स्वरूप सहकारी राज्याचे असेल. सामूहिक हिताच्या नावाखाली व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा घालणे अयोग्य आहे. त्यांच्या मते स्वातंत्र्य हे श्रेष्ठतम मूल्य असते की, त्यातून इतर सर्व मूल्यांचा उगम होतो. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी माणसाच्या चाललेल्या या संघर्षातून त्याला सत्याचा शोध लागतो. हे सत्य म्हणजे अमूर्त अशी कल्पना नव्हे, तर ते माणसाच्या ज्ञानावर आधारित असणारे सत्य होय.

**(४) वैज्ञानिक दृष्टिकोन –**

पूर्वीच्या काळात मानवाबद्दल शास्त्रीय ज्ञान फारसे नव्हते. आधुनिक काळात भौतिक व जैविक शास्त्रातील संशोधनामुळे असे दिसून येते की, मानवी वर्तनामागे दैवी किंवा अतिभौतिक शक्तींचा संबंध नाही. माणसाचे सर्व गुणविशेष आणि त्यांच्याजवळील क्षमता भौतिक आहेत. शास्त्रीय संशोधनाद्वारे त्यांचे स्वरूप समजून घेणे आपल्याला शक्य आहे. आधुनिक काळातील शास्त्रीय प्रगतीमुळे

पूर्वीच्या काळात गृहीत धरलेल्या अनेक चुकीच्या तत्त्वांचा त्याग करणे आधुनिक मानवतावाद्यांना शक्य झालेले आहे. एक तत्त्व म्हणजे विश्वातील सर्व घडामोडी ह्या निश्चित नियमानुसार होत असतात. दुसरे तत्त्व म्हणजे मानव हा उत्क्रांतीतून निर्माण झालेला प्राणी आहे.

**(५) माणूस विवेकशील असतो –**

माणसाचा जसा बौद्धिक विकास झाला तसा मनुष्यप्राणी अनुकूल नैसर्गिक पद्धतीचा लाभ उठवत आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आपले जीवन अधिकाधिक समृद्ध बनवू लागला. माणसाला ही गोष्ट शक्य झाली. कारण त्याच्याजवळ बुद्धी आहे कल्पनाशक्ती आहे. त्या कल्पनाशक्तीच्या जोरावर तो आपल्या गरजांनुसार नैसर्गिक परिस्थितीत बदल घडवून आणू शकतो. रॉय यांच्या मते नवमानवतावाद माणसाची ही गरज पूर्ण करणारी तत्त्वप्रणाली आहे.

**(६) धार्मिक, सामाजिक नियम – अनावश्यक –**

रॉय यांच्या मते मनुष्य हा स्वभावतः नीतिमान प्राणी आहे. मनुष्य प्राण्यामध्ये बुद्धिनिष्ठता नैसर्गिक तशीच नीतिमत्ता नैसर्गिक असते. माणूस हा निसर्गतः नीतिमान असल्याने त्याच्या नैतिक वर्तनामागे धार्मिक किंवा सामाजिक आधार असणे अनावश्यक आहे.

**(७) व्यक्तीचे श्रेष्ठत्व –**

व्यक्ती व समाज यात व्यक्ती श्रेष्ठ असून, समाज ही माणसाची निर्मिती आहे. विशिष्ट उदेशांच्या पूर्ततेसाठी माणसाने समाज निर्माण केला आहे.

**निष्कर्ष –**

मानवेंद्रनाथ रॉय यांनी आपला मानवतावाद इतर मानवतावादी विचारवंतांपेक्षा वेगळा आहे हे दर्शवण्यासाठी त्याला मूलगामी मानवतावाद,एकात्म मानवतावाद किंवा नवमानवतावाद अशा विशेषांनी संबोधले आहे. फ्रेंच व ब्रिटिश विचारवंतांनी मानवतावादी विचारांच्या परंपरेचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला. हे विचारवंत मानवतावादी होते पण त्यांनी माणसापेक्षा दैवी शक्ती श्रेष्ठ मानली. मानवी जीवन हे त्यांच्या दृष्टीने एक गूढ राहिले. युरोपातील मानवतावादी यांना विचारवंतांच्या विचारांतील दोष दूर करण्याची आवश्यकता रॉय यांना वाटली.

**संदर्भसूची –**


१. कर्णिक ब.भ., मानवेंद्रनाथ रॉय.
२. भारतीय राजकीय विचार --बी.बी.पाटील.
३. प्राचीन व आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत --डॉ. बा.बा.पाटील
४. भारतीय राजकीय विचारवंत -- डॉ.भोळे .भा.ल.
५. मानवेंद्रनाथ रॉय : चरित्र व विचार भाग १ भाई बेके